◆ १ वर्ष - ४ ◆ अंक -३७० ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI NO. MAHMAR/2020/79677 ◆ ISSN NO. - 2582-9971 ◆ EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE ◆ मुख्य संपादक : माधव आ. हिवाळे मो.नं. 9765332897

दैनिक भारत संग्राम


बुधवार, दि. २० मे २०२६

सत्याचा बुलंद आवाज

**TRENDING NEWS**

83 वर्षीय अमिताभ बच्चन रुग्णालयात दाखल:दावा- 16 मे पासून नानावटी रुग्णालयाच्या ए-विंगमध्ये, जवळच्या सूत्रांनी सांगितले- ही नियमित तपासणी

■ पान 3 वर



## # SHORT NEWS

### महिलेची सोनसाखळी लंपास

**यवतमाळ :** येथील जांब रोडवरील सुयोग मंगल कार्यालयाजवळून एका ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅमची सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने लंपास केली. सौ. रेखा दिलीपराव चोंडके यांनी या प्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, चोरी गेलेल्या पोतची किंमत १५,६३६ रुपये आहे. ही घटना ११ मे रोजी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास घडली.

### ८ लाखांची फसवणूक

**यवतमाळ :**उमरसरा येथील एका ७३ वर्षीय व्यक्तीच्या मुलाला नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सुरज शरद गामरे (रत्नागिरी) आणि गणेश वसंतराव झाडे (यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी फिर्यादी दत्तात्रेय देशकर यांच्या मुलाकडून ५ लाख आणि त्यांच्या नातेवाईकाकडून ३ लाख रुपये घेऊन ही फसवणूक केली. अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

### स्विफ्ट कारची चोरी

**यवतमाळ :** लोहारा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या वाघापूर येथील सह्याद्री अपार्टमेंटमधून एम.एच. ३२ वाय. ०८५७ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार चोरीला गेली आहे. जितेंद्र माणिकराव गुजर यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली असून, कारची किंमत २ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. ही घटना १० मे रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

### उमरखेडमध्ये घरफोडी

**उमरखेड :** तालुक्यातील कुपटी येथे अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २,२२,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. पोफाळी पोलिसांनी या प्रकरणी सौ. सुमनबाई सूर्यवंशी यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. चोरट्याने १.०२ लाखांचे दागिने आणि १.२० लाखांची रोकड लंपास केली आहे.

### मोटारींच्या केबलची चोरी

**घाटंजी :** तालुक्यातील सायफळ शिवारात पैनगंगा नदीकाठी असलेल्या शेतकरी मोटारींच्या केबलवर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. नागोराव दत्ता राठोड यांच्यासह इतर शेतकऱ्यांचे मिळून सुमारे २३०० फूट केबल (किंमत २३,००० रुपये) चोरून नेण्यात आले आहे. याप्रकरणी पारवा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### साहित्याची चोरी

घाटंजी : तालुक्यातील आमडी येथे एका ३७ वर्षीय इसमाने दारूच्या नशेत लोखंडी पोल पाडून त्यावरील लाईट, सोलर प्लेट आणि इतर साहित्य असा एकूण १०,००० रुपयांचा माल चोरून नेला. सपना अमोल ठाकरे यांच्या तक्रारीवरून घाटंजी पोलिसांनी संशयित आरोपी बबलू उर्फ गणेश रमेश चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### पंपांवर लांबलचक रांगा; डबल इंजिन सरकारच्या इंजिनचे तेल पंण संपले का, विरोधकांची टीका

# महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांत इंधन टंचाई

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**मुंबई :** इराण विरुद्ध अमेरिका, इस्त्रायल युद्धामुळे जगातील अनेक देशांत इंधन टंचाई निर्माण झाली आहे. त्याचा मोठा फटका आता महाराष्ट्राला बसत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांतील पेट्रोल पंपांवर पेट्रोल - डिझेलचा तुटवडा निर्माण झाला आहे. इंधन मिळवण्याच्या शर्यतीत काही ठिकाणी वादाच्याही घटना घडत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी या प्रकरणी सरकारवर निशाणा साधत डबल इंजिन सरकारमधील तेलही संपले का? असा तिखट प्रश्न उपस्थित केला आहे.

मध्यपूर्वेत अमेरिका व इस्त्रायलने इराण विरोधात मोर्चेबांधणी केली आहे. सध्या या भागात तणावपूर्ण शांतता आहे. पण होर्मुझची सामुद्रधुणी बंद असल्यामुळे येथून होणारी इंधनाची वाहतूक ठप्प पडली आहे. यामुळे भारतात इंधन टंचाई निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे लोकांच्या संतापाचा उद्रेक होत आहे. आमदार जयंत पाटील यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. जयंत पाटील म्हणाले, जळगाव मध्ये पेट्रोल नाही म्हणून काही अज्ञातांनी पंपावर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याच्या पोटात चाकू खुपसला. बुलढाण्यात पेट्रोल मिळण्याच्या आशेवर लोकं 12 तास लाइनमध्ये उभे राहिले, अकोलाच्या वाशिम नाका येथे पेट्रोल डिझेल मिळावे म्हणून हाणामारी. नागपूर मध्ये बेपत्ता मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडे डिझेल नाही. चालय तरी काय? डबल इंजिन सरकारच्या इंजिन मधील तेल पण संपले का? असा प्रश्न त्यांनी सरकारला केला आहे नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पेट्रोल पंपांना डिझेलचा कमी पुरवठा होत आहे. सध्या मिळणाऱ्या अपुऱ्या डिझेलमुळे शेतीच्या मशागतीची कामे ठप्प पडण्याची शक्यता आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, एक बैलजोडी पोसण्यासाठी वर्षाकाठी जवळपास सव्वा लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे ते पोसायला परवडत नाहीत. त्यामुळे शेतकरी ट्रॅक्टरद्वारे शेतीच्या मशागतीची कामे करत आहेत.

### उधारीत पेट्रोल - डिझेल देणे बंद

मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत पेट्रोलियम कंपन्या पेट्रोल पंप मालकांना 3-5 दिवस उधारित पेट्रोल - डिझेल द्यायचे. पण 21 मार्चनंतर कंपन्यांनी ही क्रेडिट पॉलिसी बंद करून ॲडव्हान्स पेमेंट सक्तीचे केले. त्यामुळे बहुतांश पंप मालक पेट्रोलच्या तुलनेत डिझेल कमी मागवत आहेत. याचाही फटका ट्रॅक्टर चालकांना बसत आहे.

### नाशिक येथेही टंचाईचे सावट

नाशिक शहरात पेट्रोल व डिझेलचा कोणताही तुटवडा नसल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. पण प्रत्यक्षात परिस्थिती पूर्णतः वेगळी आहे. शहरातील त्र्यंबकरोड, वडाळारोड, पंचवटी, सातपूर, सिडको आदी भागांतील अनेक पेट्रोलपंपांवर मंगळवारी डिझेल भरण्यासाठी वाहनांच्या लांबलचक रांगा लागलेल्या दिसल्या. काही पेट्रोलपंपांवर 'डिझेल उपलब्ध नाही', अशा पाट्या लावण्यात आल्याने वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

### छत्रपती संभाजीनगरमध्येही काही ठिकाणी बेहाल

छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक' चे फलक झळकत असल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. पंपांवर वाहनांच्या रांगाच रांगा सध्या दिसत आहेत. शहर व ग्रामीण भागात एका दिवसांत 6 लाख 48 हजार पेट्रोल, तर 11 लाख 48 हजार लिटर डिझेलची विक्री झाली.

## वाशिम जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.संयम बाळगून आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा उपलब्ध असून, पेट्रोल पंपांवर गर्दी न करण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गेल्या काही दिवसांपासून इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही माहिती दिली आहे. जिल्हा प्रशासन सर्व ऑईल कंपन्या आणि पेट्रोल पंप धारकांच्या सतत संपर्कात आहे. पेट्रोल पंपांवर इंधनाचे वाटप सुरळीत व्हावे आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. एकाच दिवसात पावणेआठ लाख लिटर इंधन दाखल जिल्ह्यात आज (दि. १९ मे) विविध ऑईल कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात इंधनाचा पुरवठा झाला आहे. यामध्ये: IOCL कडून ५६ हजार लिटर पेट्रोल आणि २ लाख २ हजार लिटर डिझेल. BPCL कडून ४५ हजार लिटर पेट्रोल आणि २ लाख ३० हजार लिटर डिझेल. HPCL कडून ६६ हजार लिटर पेट्रोल आणि १ लाख ७५ हजार लिटर डिझेल. जिल्ह्यात आज एकाच दिवसात एकूण १ लाख ६७ हजार लिटर पेट्रोल आणि ६ लाख ७ हजार लिटर डिझेलचा साठा प्राप्त झाला आहे. तसेच दररोज असाच इंधनसाठा जिल्ह्याला प्राप्त होणार आहे. अतिरिक्त खरेदी टाळा; प्रशासनाचे आवाहन कंपन्यांकडून दररोज याच पद्धतीने इंधनाचा पुरवठा होणार असल्याचे पुरवठा शाखेने सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता, केवळ आवश्यकतेनुसारच पेट्रोल-डिझेल खरेदी करावे. पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये ,प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## पीसीपीएनडीटी'ची कठोर अंमलबजावणी करा !- जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** जिल्ह्यात गर्भलिंग निदानाला पूर्णपणे आळा घालण्यासाठी आणि मुलींचे जन्म प्रमाण वाढविण्यासाठी 'पीसीपीएनडीटी' कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले .

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा टास्क फोर्स आणि सल्लागार समितीच्या विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा महिला बालकल्याण




समितीच्या अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया यांच्यासह संबंधित समितीचे सदस्य व अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या पीसीपीएनडीटी सेलमार्फत राबविण्यात आलेल्या व्यापक तपासणी मोहिमेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील शासकीय व खाजगी गर्भपात केंद्रे आणि सोनोग्राफी केंद्रांची अचानक तपासणी करण्यात येत असून, कायद्यांतर्गत आवश्यक असलेल्या 'एफ' फॉर्मची काटेकोर पडताळणी करण्यात येत आहे. सोनोग्राफी केंद्रांमधील नोंदींची नियमित तपासणी करून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांचा पर्दाफाश करण्यासाठी प्रशासनाकडून 'डिकॉय' (बनावट ग्राहक) कारवायांवर विशेष भर दिला जावा. यापूर्वी झालेल्या कारवायांच्या प्रयत्नाचा संदर्भ देत, जिल्हाधिकाऱ्यांनी आगामी काळात डिकॉय कारवायांचे प्रयत्न आणखी वाढविण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. जिल्ह्यातील बाललिंग गुणोत्तराचा आढावा घेताना, मानोरा तालुक्याची कामगिरी समाधानकारक असल्याचे समोर आले आहे. मात्र, मालेगाव, कारंजा, रिसोड, मंगरुळपीर तालुक्यातील गुणोत्तरात आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे सांगत जिल्हाधिकाऱ्यांनी तिथे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले. बाललिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानांतर्गत माहिती फलक, जनजागृती रॅली, पोस्टर्स व माहितीपत्रक वितरण यांसारखे उपक्रम सातत्याने राबविण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

## एचएसआरपी बसविण्यासाठी वाहनधारकांना मुदतवाढ

### जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट अनिवार्य, अधिकृत केंद्रांवरूनच नंबर प्लेट बसवण्याचे आवाहन

**भारत संग्राम | प्रतिनिधी**




**वाशिम :** राज्यातील लाखो वाहनधारकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (HSRP) बसविण्यासाठी राज्य शासनाने अखेर मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहन विभागाने जाहीर केलेल्या नवीन आदेशानुसार, आता वाहनधारकांना ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या विहित कालावधीत सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांवर एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे.

राज्य शासनाने यापूर्वी वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांनुसार, राज्यातील सर्व जुन्या वाहनांवर एचएसआरपी (HSRP) बसवणे कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही अनेक वाहनधारकांकडून ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. मुदत संपत आल्याने वाहनधारकांमध्ये संभ्रम आणि केंद्रांवर गर्दीची शक्यता निर्माण झाली होती, या निर्णयामुळे आता मोठा दिलासा मिळाला आहे. चोरी आणि गुन्हेगारीला बसणार आळा एचएसआरपी बसविल्यामुळे वाहनांची ओळख अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे. या विशेष नंबर प्लेटमुळे वाहन चोरीच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवता येईल, तसेच बनावट क्रमांक प्लेट वापरणे अशक्य होणार असल्याने वाहनसंबंधित गुन्हेगारी प्रकारांना मोठ्या प्रमाणात आळा बसेल, असा विश्वास परिवहन विभागाने व्यक्त केला आहे. फसवणूक टाळण्यासाठी वाहनधारकांनी केवळ परिवहन विभागाने मान्यता दिलेल्या अधिकृत केंद्रांवरून किंवा वाहन वितरकांकडूनच (डीलर्स) एचएसआरपी बसवून घ्यावी, असेही परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. अनधिकृत व्यक्तींकडून नंबर प्लेट घेणे बेकायदेशीर ठरेल. एचएसआरपी संदर्भात ऑनलाईन नोंदणी करताना किंवा नंबर प्लेट मिळवताना काही अडचण अथवा तक्रार असल्यास, वाहनधारकांनी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा परिवहन विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अधिकृत ई-मेलद्वारे आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सवड येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अधिपत्याखालील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सवड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मागासवर्गीय प्रवर्गनिहाय रिक्त असणाऱ्या आरक्षित टक्केवारीनुसार समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अपंग तसेच अनाथ प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहणार आहेत. शालेय विभागातील इयत्ता ८ वी, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी तसेच बिगर व्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालयातील प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरू शकतात. जास्तीत-जास्त पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करून शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या विविध सोयी-सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सवड येथे प्रत्यक्ष भेट द्यावी.

## महिला सुरक्षा, बालसंरक्षणासाठी यंत्रणांनी अधिक संवेदनशीलतेने काम करावे - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे निर्देश

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** जिल्ह्यात महिला व बालकांच्या संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. महिलांवरील अत्याचार, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार तसेच बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये अत्यंत संवेदनशीलतेने व तत्परतेने कार्यवाही करण्यात यावी. विविध विभागांनी परस्पर समन्वयातून महिला सक्षमीकरण आणि बाल संरक्षणासाठी अधिक परिणामकारक उपक्रम राबवावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित 'जिल्हा सनियंत्रण समिती'च्या आढावा बैठकीत ते बोलत होते.




बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा महिला बालकल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, परिविक्षाधीन अधिकारी गणेश ठाकरे, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया यांच्यासह संबंधित समितीचे सदस्य व अधिकारी उपस्थित होते. बैठकीत हुंडा प्रतिबंध, महिला संरक्षण, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध, मिशन शक्ती, मिशन वात्सल्य, सखी वन स्टॉप सेंटर, बालविवाह प्रतिबंध तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासह विविध शासकीय उपक्रमांचा सखोल आढावा घेण्यात आला. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने शाळा, महाविद्यालय व ग्रामस्तरावर प्रचार आणि जनजागृतीचे कामकाज सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. जिल्ह्यात हुंडा प्रतिबंधासाठी जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात येत असून, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत पीडित महिलांना संरक्षण व कायदेशीर मदत दिली जात आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधासाठी जिल्ह्यातील ३०० आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. गावपातळीवर बाल संरक्षण समित्या गठीत करण्यात आल्या असून, त्यांच्या नियमित बैठका घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आढावा घेताना बैठकीत सांगण्यात आले की, जिल्ह्यात 'माविम' अंतर्गत 'उमेद' अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत प्राप्त तक्रारींचे तातडीने निवारण करण्यात येत आहे. बाल संरक्षण क्षेत्रात प्रशासनाने ४० बालविवाह रोखण्यात यश मिळवले असून, चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर प्राप्त झालेल्या ३६ तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यात आली आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील १६ बालकांना बाल संगोपन योजनेचा लाभ देण्यात आला असून, ६ अनाथ बालकांना अनाथ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, देहविक्री करणाऱ्या महिला व तृतीयपंथी समुदायातील व्यक्तींना मतदान कार्ड, रेशन कार्ड आणि आधार कार्ड उपलब्ध करून देत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. यासाठी सर्व विभागांनी अधिक प्रभावीपणे कार्य करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. बैठकीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी विविध योजनांचे सविस्तर सादरीकरण केले. कुपोषणमुक्त बालकांसाठी संयुक्त स्क्रिनिंग मोहिम प्रभावीपणे राबवा महिला व बालकल्याण विभाग तथा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांमधील कुपोषणाचे लवकर निदान, प्रतिबंध व योग्य व्यवस्थापन करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या संयुक्त स्क्रिनिंग मोहिमेअंतर्गत अनिवार्य मानक कार्यपद्धतीची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवांना अधिक बळकटी देण्यासाठी मासिक वाढ निरीक्षण तसेच सहामाही संयुक्त वाढ निरीक्षण व आरोग्य तपासणी मोहीम प्रभावीपणे राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**घटना - घडामोडी**

## तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत - मुख्यमंत्री

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली. सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तिर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. *श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासाठी १७२ कोटींची तरतुद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत.या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे) सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या. संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा ४१.७१ कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बाह्य वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.'श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर' परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, ॲम्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पुण्याचे जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

# 26 वर्षानंतर माजी विद्यार्थी व शिक्षकांचे स्नेहसंमेलन उत्साहात

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** स्थानिक नाथुरिम नारायणदास मुंदडा विद्यालयाच्या बॅच 2000 च्या माजी विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचे भव्य स्नेहसंमेलन नुकतेच अत्यंत उत्साहपूर्ण पार पडले सव्वीस वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी जुन्या आठवणींना उजाळा देत शालेय जीवनातील क्षण पुन्हा अनुभवले या स्नेहसंमेलना साठी तब्बल 160 माजी विद्यार्थी उपस्थित होते विशेष म्हणजे विद्यालयातील माजी शिक्षकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली कार्यक्रमाची सुरुवात गोपी खंडेलवाल यांच्या प्रस्तावनेने झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश तारे तसेच सुमित खिल्लारे यांनी प्रभावी शैलीत करत संपूर्ण कार्यक्रमात उत्साह निर्माण केला यावेळी शामसुंदर मुंदडा,राम मुंदडा,आशिष मुंदडा,जगदीश बळी,लक्ष्मण ढोबळे,जयसिंग घुगे हे संस्थेचे संचालक यांच्या उपस्थितीत तसेच विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक गजानन पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी विद्यार्थ्यांच्या एकोप्याचे कौतुक करत समाजामध्ये सकारात्मक कार्य करत राहण्याचे आवाहन केले तसेच जुन्या विद्यार्थ्यांनी शाळेशी कायम नाते जोडून ठेवावे,असेही मत व्यक्त करण्यात आले या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने बॅच 2000 तर्फे विद्यालय परिसरातील वृक्षारोपण उपक्रमासाठी 5100 रुपयांची देणगी प्रदान करण्यात आली पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश यामधून देण्यात आला कार्यक्रमात गुरुजनांचा सत्कार,विविध सांस्कृतिक कार्यक्रम,सुंदर गाणी,मनोरंजन उपक्रम,जुन्या आठवणींना उजाळा देणाऱ्या गप्पा तसेच मित्र-मैत्रिणींचे मनोगत यामुळे वातावरण भावनिक झाले होते अनेक वर्षांनी भेट झाल्यामुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विविध समित्यांनी अत्यंत जबाबदारीने काम केले पूनम गट्टाणी (लुनावली) यांनी विशेषतः महिला मित्र-मैत्रिणींशी संपर्क साधून त्यांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले तसेच सुधीर सारडा यांनी आयोजित केलेल्या मजेशीर गेम्स आणि उपक्रमांनी उपस्थितांचे विशेष मनोरंजन केले दूरवरून प्रवास करून आलेल्या सर्व मित्र-मैत्रिणींचे यावेळी विशेष आभार मानण्यात आले कार्यक्रमाच्या शेवटी सागर भुतडा यांनी आभार प्रदर्शन केले कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बॅच 2000 च्या आयोजन समितीने विशेष परिश्रम घेतल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## वाशिममध्ये 'वासंतिक व्याख्यानमाला-२०२६' चे आयोजन

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशिम :** जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी वृंदाच्या वतीने "वाशिम वासंतिक व्याख्यानमाला-२०२६" चे आयोजन करण्यात आले असून, २० मे ते २४ मे २०२६ या कालावधीत विविध क्षेत्रातील मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. वाशिमच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व साहित्यिक परंपरेत भर घालण्याच्या उद्देशाने ही पाच दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प २० मे रोजी सायंकाळी ७ वाजता होणार असून, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबईचे संचालक डॉ. तेजस गर्गे हे "शिवछत्रपतींचे किल्ले जागतिक वारसा – एक प्रवास" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. २१ मे रोजी प्रा. इंद्रजीत भालेराव यांचे "शोध – कृषी संस्कृतीचा" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. २२ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता ज्येष्ठ साहित्यिक मा. बाबाराव मुसळे यांचा सत्कार व "वाशिम जिल्ह्याचे वाङ्मयीन योगदान" या विषयावरील व्याख्यान होणार आहे. त्यानंतर रात्री ८ वाजता प्रा. प्रशांत मोरे यांचा "आई तुझा हात – परिस" या विषयावरील काव्यगायनाचा कार्यक्रम रंगणार आहे. २३ मे रोजी श्रीमती माधुरी यादवडकर या "नव्या काळाच्या संदर्भातून : आनंददायी पालकत्व" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर २४ मे रोजी मराठी भाषा विभाग मंत्रालयाचे सचिव तथा वाशिम जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. किरण कुलकर्णी हे "अभिजात मराठी – दिशा आणि भवितव्य" या विषयावर व्याख्यान देणार आहेत. सर्व कार्यक्रम स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित करण्यात आले आहेत. व्याख्यानमालेस वाशिमकर नागरिकांनी सहपरिवार उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## साखरखेर्डा येथील औषध विक्रेते यांच्या वतीने बंदचे आवाहन .

### साखरखेर्डा येथील औषधीची दुकाने राहणार बंद !

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे



**बुलढाणा :** आपल्या विविध मागण्यासाठी ऑल इंडिया केमिस्टस असोसिएशनच्या वतीने भारतभरातील मेडिकल दुकाने बंद राहणार असून यामध्ये सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा येथील मेडिकल असोसिएशनच्या वतीने सुद्धा सहभाग नोंदवला असून 20 मे रोजी साखरखेर्डा येथील मेडिकल स्टोअर्स बंद राहणार आहे ,याबाबत साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना मेडिकल असोसिएशनच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे ' ऑनलाइन औषधी विक्री बंद करा ' ( GSR 817 दि २८ .० ८ . २०१८ मांगे घेण्यात यावा ' कॉर्पोरेशन द्वारे व्यावसायिक डिस्काउंट बंद करा , बनावट औषधी पासून देश वाचवा ' कोविड जीआर मांगे घ्या अशा विविध मागण्या यामध्ये करण्यात आले असून ' त्यामुळे साखरखेडा परिसरातील औषधाची दुकाने बंद असणार आहे ' यावेळी निवेदन देताना नितीन ठोसरे अध्यक्ष , श्याम राऊत ' गोपाल मानवतकर 'तुषार चव्हाण विजय जैवळ ' अविनाश मुधमाळी ' संतोष खरात ' विकी जगताप ' राहुल कामे ' गजानन मुंडे यावेळी उपस्थित होते .

## पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील ढासाळवाडी गावासाठी टँकर मंजूर

भारत संग्राम | प्रतिनिधी

**बुलढाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील ढासाळवाडी गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

ढासाळवाडी येथे 690 पशुधन व 1 हजार 510 लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे 35 हजार 900 लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## स्वखर्चाने थंडपिण्याच्या पाण्यासाठी वाटर फिल्टर व कुलर लावून दिले सोबतच बोअरचे पाणी वाटप...

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** सध्या ठीक ठिकाणी सामान्य जनता पाणी टंचाईमुळे त्रस्त झाल्याचे जिकडे तिकडे पाहायला मिळते पाण्याची शोधा शोध करावी लागत आहे अशातच शिरपूर येथील किराणा दुकानदार छोटू उर्फ नारायण दत्तराव देशमुख यांनी एक लाख रुपयांहून अधिक खर्च करून लोकांना शुद्ध व थंडपिण्याच्या पाण्यासाठी वाटर फिल्टर व कुलर लावून दिले सोबतच बोअरच्या माध्यमातून परिसरातील पाणी टंचाई ग्रस्तांना वितरण करण्याचे समाज कार्य करीत आहेत पाण्यासाठी लोकांची वणवण होत असल्याचे चित्र जवळपास सगळीकडे दिसून येते आहे. त्याला शिरपूर सुद्धा अपवाद नाही गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या आडोळ प्रकल्पातील जलसाठा झपाट्याने कमी झाल्याने शिरपूर येथे पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्वीच्या चार दिवसा ऐवजी आता दहा ते बारा दिवस लागत आहे त्यामुळे गावकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे अशातच उधारी बंद किराणा दुकान चे मालक छोटू उर्फ नारायण दत्तराव देशमुख यांनी उन्हाळ्यात सामान्य माणसासाठी थंड व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून एक लाख रुपयाहून अधिक स्व खर्च करून पाणी उपलब्ध करून दिले त्यांनी आपल्या दुकानासमोर बोअर खोदून तेथे वाटर फिल्टर वॉटर कुलर लावले या थंडगार पाण्यामुळे दररोज हजारो लोकांची तहान भागविली जात आहे. तसेच परिसरातील लोकांचे जल स्तोत्र आटल्यामुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे परिसरातील पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या लोकांना सुद्धा पाणी वितरण केले जात आहे.छोटू देशमुख यांच्या पुढाकाराचे गावामध्ये कौतुक केले जात आहे. पूर्ण गावाची जरी नाही तरी काही लोकांची पाणीटंचाई छोटू देशमुख यांच्या माध्यमातून दूर झाली आहे. पिण्याचे थंड व शुद्ध पाणी नियमित शालेय विद्यार्थी व जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याची इच्छा मागील काही वर्षांपासून होती इतक्यातच घेतलेल्या बोअरला चांगले पाणी लागल्याने ही इच्छा पूर्ण होऊ शकली याचे समाधान वाटत असल्याचे छोटू देशमुख यांनी म्हटले.

# डायल 112 वर खोटी माहिती देणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल...

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

**पोलीस निरीक्षक केशव वाघ यांचे आवाहन "डायल 112 ही सेवा जनतेच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती देताना तिची सत्यता पडताळूनच माहिती द्यावी खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल आपत्कालीन सेवांचा गैरवापर टाळून नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे."**

— केशव वाघ
पोलीस निरीक्षक,शिरपूर पोलीस स्टेशन

**मालेगांव :** - शिरपूर पोलीस स्टेशनची कठोर कारवाई नागरिकांनी अफवा व खोट्या कॉलपासून दूर राहण्याचे आवाहन शासनाच्या माध्यमातून नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या "डायल 112" या महत्त्वाच्या सेवेला खोटी माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध शिरपूर पोलीस स्टेशनने कठोर कारवाई केली आहे या घटनेमुळे विनाकारण खोटे कॉल करून पोलिस यंत्रणेचा वेळ व संसाधने वाया घालविणाऱ्यांना स्पष्ट इशारा मिळाला आहे प्राप्त माहितीनुसार,दिनांक 19 मे 2026 रोजी डायल 112 वर एका कॉलरने ग्राम नावली येथे दोन गाई व बैल वाहनात टाकून कत्तलखान्याकडे नेण्यात येत असल्याची माहिती दिली होती सदर माहिती गांभीर्याने घेत डायल 112 वरील पोलिस अंमलदार पोहेका/221 नागेश देवकर यांनी तात्काळ शासकीय वाहनासह घटनास्थळी धाव घेतली पोलिसांनी ग्राम नावली येथे प्रत्यक्ष जाऊन चौकशी केली असता,अशा प्रकारची कोणतीही घटना घडलेली नसल्याचे समोर आले संबंधित कॉलरने घटनास्थळी कोणतीही ठोस माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिली तसेच गावातील सरपंचांकडूनही माहिती घेतली असता सदर प्रकार खोटा असल्याचे स्पष्ट झाले त्यानंतर पोलिसांनी तपास करून कॉल करणारा प्रताप कुमार अर्जुन बाजड (वय 36 वर्षे,रा. नावली,ता.रिसोड,जि.वाशिम) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत कलम 217 प्रमाणे शिरपूर पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक 227/2026 नुसार गुन्हा दाखल केला आहे डायल 112 ही सेवा नागरिकांच्या सुरक्षेसाठी व आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत पोहोचविण्यासाठी सुरू करण्यात आलेली असून,अशा खोट्या माहितीमुळे पोलिस यंत्रणेचा अमूल्य वेळ वाया जातो आणि खऱ्या गरजूंपर्यंत मदत पोहोचण्यास अडथळा निर्माण होतो त्यामुळे शिरपूर पोलिसांनी नागरिकांना जबाबदारीने वागण्याचे आवाहन केले आहे.

**भारत संग्राम (मराठी दैनिक) RNI No. MAHMAR/2020/79677**
मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४५५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक " भारत संग्राम ", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४५५०५ (महाराष्ट्र) संपादक - महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## थोडक्यात

### ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशिम :** भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे, या दृष्टीने केंद्र शासनाने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने ही हस्तलिखिते राज्य शासनाकडे सुपूर्द करावयाची झाल्यास शासन ती स्वीकारेल. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत: • कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर - क्लस्टर केंद्र • भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे - क्लस्टर केंद्र, आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - स्वतंत्र केंद्र महाराष्ट्रासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तर अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत “Gyan Bharatam” हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, आपल्याकडे जर काही हस्तलिखिते उपलब्ध असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲप वर अपलोड करावी व या राष्ट्र कार्यात सहभाग नोंदवावा.असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंकचा वापर करावा.

### एल निनोच्या प्रभावामुळे यंदा कमी पावसाची शक्यता

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशिम :** भारतीय हवामान विभागाने चालू वर्षामध्ये ‘एल निनो’च्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची आणि त्याचे वितरण अनियमित होण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, खरीप हंगामात संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीचा फटका शेतीला बसू नये, म्हणून शेतकऱ्यांनी आतापासूनच शेती व्यवस्थापनात आवश्यक बदल करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी शेतकऱ्यांना योग्य नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. संभाव्य एल निनो परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी खालीलप्रमाणे महत्त्वाची मार्गदर्शक नियमावली जाहीर केली आहे: १. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड व टप्प्याटप्प्याने पेरणी कमी आणि अनिश्चित पावसाच्या काळात जास्त पाणी लागणारी आणि दीर्घ कालावधीची पिके घेणे जोखमीचे ठरू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचा प्रकार आणि उपलब्ध पाण्याचा विचार करून सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या कमी कालावधीत येणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे. तसेच, कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या दुष्काळ सहनशील सुधारित वाणांचाच वापर करावा. हवामान विभागाच्या अंदाजाचा नियमित अभ्यास करून आणि पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी. पावसात मोठा खंड पडण्याची शक्यता असल्यास टप्प्याटप्प्याने पेरणी करावी.

## पान एक वरून

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन मुंबईतील नानावटी रुग्णालयात दाखल आहेत. पत्रकार विकी ललवानी यांनी त्यांच्या यूट्यूब अकाउंटवरून दावा केला आहे की, त्यांना १६ मे रोजी दाखल करण्यात आले आहे. ते रुग्णालयाच्या ए-विंगमध्ये आहेत. यूट्यूब चॅनलवर पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये विकी ललवानी यांनी सांगितले आहे की, ते बातमीची खात्री करण्यासाठी स्वतः नानावटी रुग्णालयात पोहोचले होते, जिथे त्यांना बातमीची पुष्टी मिळाली. बिग बी यांना ए-विंग, तिसऱ्या मजल्यावर ठेवण्यात आले आहे. त्यांनी असाही दावा केला आहे की, अभिषेक बच्चन देखील वडिलांना भेटण्यासाठी मंगळवारी संध्याकाळी साडेचार वाजता रुग्णालयात पोहोचले होते. विकी ललवानी यांच्या मते, अमिताभ बच्चन बऱ्याच काळापासून पोटाच्या समस्यांनी त्रस्त आहेत. दैनिक भास्करने बातमीची पुष्टी करण्यासाठी दिग्दर्शक विवेक शर्मा यांच्याशी संवाद साधला असता, ते म्हणाले, ‘त्यांची तब्येत खूप खराब आहे. मी दोन आठवड्यांपूर्वी त्यांना भेटण्यासाठी वेळ मागितला होता, तेव्हा ते म्हणाले की सध्या याची परवानगी नाही. त्यामुळे हे निश्चित झाले होते की ते एकतर रुग्णालयात आहेत

# देशव्यापी औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना (All India Organisation of Chemists and Druggists) यांच्या वतीने बुधवार, दि. 20 मे 2026 रोजी देशव्यापी एक दिवसीय औषध विक्री बंदची घोषणा करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांना अत्यावश्यक औषधांचा पुरवठा अखंडित व सुरळीत उपलब्ध राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, बुलढाणा कार्यालयाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत.



दि. 13 मे 2026 रोजी अन्न व औषध प्रशासन कार्यालयात सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन प्रल्हाद धीरके यांच्या अध्यक्षतेखाली केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत बंदच्या काळात नागरिकांना आवश्यक औषधे उपलब्ध राहावीत यासाठी समन्वय, खबरदारी आणि पर्यायी व्यवस्था यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सह आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच 24 तास सुरू असणाऱ्या मेडिकल स्टोअर्सशी समन्वय साधण्यात आला आहे. अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होऊ नये यासाठी पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. तसेच आयएमए व निमा संघटनांकडेही सहकार्याची विनंती रण्यात आली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच औषधांचा अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. औषध उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास नागरिकांनी खालील हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालय हेल्पलाईन क्रमांक : गजानन प्रल्हाद धीरके, सहाय्यक आयुक्त (औषधे) – 9850150687, जयंत झोपे, प्रमुख लिपिक – 9765333474, मु. ज. खुर्दे, रोखपाल – 9922899958, विजय जाधव, डाटा एंट्री ऑपरेटर – 8262878895, अजाबराव घेवंदे – 9623556863. तालुकानिहाय आपत्कालीन औषध उपलब्धता हेल्पलाईन क्रमांक : बुलढाणा : गजानन शिंदे – 9860729624, प्रशांत ढोरे पाटील – 9730042135, निलेश गावंडे – 9422884890, अभिजीत निंबाळकर – 7972698570 चिखली : राजेश पाटील – 7038926622, स्वप्नील तायडे – 7507759777, सर्जेराव भुते – 9422883160, डोणगाव – प्रशांत चोपडे – 9588696970 मेहकर : रवींद्र वडते – 9011250800, विनोद नागवानी – 9049002419, विष्णू लाहोटी – 8793143337, उमेश मुंदडा – 8830079412 देऊळगाव राजाः राम पराड – 9764455220, चंद्रशेखर बारोटे – 8275284850, नंदकिशोर साळोख – 9960010699 सिंदखेडराजा : मंगेश खुरपे – 9011581018, शरद डोईफोडे – 9423458220, भारत जायभाये – 9860731777 लोणार : शेख अफसर – 9730772555, चंदन दरोगा – 9637296703, अक्षय मीनासे – 9881955105 मोताळा : नितीन शेळके पाटील – 9854967777, केतन मोदे – 9923881122 मलकापूर : गोपाल मालपाणी – 9422882870, गजानन धनोकार – 9423721716, श्रीकांत आढाव – 9096759099 नांदुरा : प्रेमचंद जैन – 9423146101, उमेश काळु – 9881496116, नीरज चवरे – 9096744405 जळगाव जामोद : राजेश काळे – 9850937212, अजय पलन – 8087059355, प्रमोद टाकळकर – 9767869172 संग्रामपूर : पांडुरंग इंगळे – 9420794848, शेख अफरोज – 9226055416, गिरीश केला – 9623238959 शेगाव : अजिंक्य ठाकरे – 8275341532, उमेश इंगळे – 8856845129, गजानन भिवटे – 9822427521, गोपाल गांधी – 9850670057 खामगाव : रामचंद्र आयलानी – 9922112500, जगदीश नावंदर – 9922185678, नंदकिशोर कांडेकर – 9850040568, अजय जैन – 7588802147, धर्मेश शहा – 9922112877 .

## खतांची अनियमितता आढळल्यास कृषी केंद्रांचा परवाना रद्द करणार: परवाना प्राधिकारी संतोष डाबरे यांचा इशारा

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** मेहकर येथील ‘अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस सेंटर’वर खतांचा काळाबाजार आणि शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर कृषी विभाग आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परवाना प्राधिकारी संतोष डाबरे यांनी जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्र चालकांना कडक शब्दांत इशारा दिला आहे.

संतोष डाबरे यांनी स्पष्ट केले की, "शेतकऱ्यांच्या हक्काच्या आणि शासनाच्या अनुदानित खतांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा काळाबाजार खपवून घेतला जाणार नाही. ई-पॉस (E-POS) मशीनवरील खतांचा साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळल्यास, किंवा शेतकऱ्यांच्या आधार कार्डचा गैरवापर करून बनावट नोंदी केल्याचे समोर आल्यास संबंधित कृषी केंद्रावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल."

ई-पॉस मशीनवर दिसणारा खताचा साठा आणि प्रत्यक्ष गोदामातील साठा यात कोणतीही तफावत राहता कामा नये. कोणत्याही कृषी केंद्रात परवाना संपलेली (Expiry झालेल्या) खते किंवा कीटकनाशके आढळून आल्यास ते जप्त करून कडक कारवाई केली जाईल. परवाना नसलेली किंवा लेबल व घटकांमध्ये फरक असलेली संशयास्पद उत्पादने दुकानात ठेवल्यास थेट विक्री बंदी आणली जाईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि साठा रजिस्टर अपूर्ण ठेवणाऱ्या केंद्रांचा परवाना कायमचा रद्द (Cancel) करण्यात येईल, असा कडक इशारा देण्यात आला आहे.

"अजंठा ॲग्रो सर्व्हिसेस’वर झालेली कारवाई ही केवळ सुरुवात असून, यापुढे संपूर्ण जिल्ह्यात कृषी विभागाच्या भरारी पथकांद्वारे अशीच धडक तपासणी मोहीम राबवली जाईल," असेही संतोष डाबरे यांनी सांगितले. त्यामुळे आगामी खरिपाच्या पार्श्वभूमीवर सर्व कृषी केंद्र चालकांनी आपले रेकॉर्ड आणि खत विक्री पारदर्शक ठेवावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील कोलारा गावासाठी टँकर मंजूर

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील कोलारा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

कोलारा येथे 2 हजार 845 पशुधन व 4 हजार 886 लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे 1 लाख 49 हजार 620 लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची



ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील कोलारा गावासाठी टँकर मंजूर

भारत संग्राम | प्रतिनिधी

**बुलढाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील कोलारा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

कोलारा येथे 2 हजार 845 पशुधन व 4 हजार 886 लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे 1 लाख 49 हजार 620 लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## सूर्य आग ओकतोय,उष्णतेचा कहर; तापमान ४२ अंशाच्या पार !

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

**मालेगाव :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा पारा सातत्याने वाढत असून, १९ मे रोजी परिसरात तापमानाने तब्बल ४२ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे मे महिन्याच्या उत्तरार्धात उन्हाने अत्यंत भीषण स्वरूप धारण केले असून,या विक्रमी तापमानामुळे संपूर्ण मालेगाव तालुका अक्षरशः होरपळून निघाला आहे वाढत्या उष्णतेमुळे स्थानिक जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे वाढत्या उष्णतेमुळेत शहरातील रस्ते, ? दुपारच्या वेळी ओस पडू लागले आहे, ? सकाळी ९ वाजेपासूनच उन्हाच्या तीव्र झळा लागण्यास सुरुवात होते दुपारी तर सूर्य आग ओकत असल्याने,

नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे दुपारच्या सुमारास शहरातील मुख्य बाजारपेठा आणि रस्ते अक्षरशः ओस पडत असल्याचे चित्र आहे नागरिकांकडून बचावासाठी सुती कपडे,स्कार्फ,गॉगल्स आणि थंड पेयांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे उष्णतेपासून रुग्णालयांमध्ये उष्णतेचा त्रासामुळे होणाऱ्या नागरिकांची गर्दी वाढत असल्याचे चित्र दिसत आहे प्रचंड उकाडा आणि घामाच्या धारांमुळे नागरिकांमध्ये उष्माघाताचा (सनस्ट्रोक) धोका कमालीचा वाढला आहे अचानक वाढलेल्या या उष्णतेमुळे आरोग्य यंत्रणेवरही ताण पडत आहे.स्थानिक रुग्णालयांमध्ये डिहायड्रेशन, चक्कर येणे,ताप आणि उलट्या अशा त्रासांमुळे ग्रस्त असलेल्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे यामध्ये प्रामुख्याने लहान मुले,वृद्ध आणि पोटा पाण्या साठी उन्हातानात काम करणाऱ्या मजूर वर्गाला या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे वाढती उष्णता केवळ मानवी आरोग्या साठीच नव्हे,तर तालुक्याच्या शेतीसाठी आणि जलसाठ्यासाठीही चिंतेची बाब ठरत आहे कडक उन्हामुळे तालुक्यातील पाण्याचे मुख्य स्त्रोत आणि जलसाठे झपाट्याने आटत चालले आहेत.परिणामी,ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या अधिकच तीव्र झाली असून,नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे प्रशासनाकडून नागरिकांना दुपारी जास्त वेळ उन्हात न थांबण्याचे आणि जास्तीत जास्त पाणी पिण्याचे आवाहन करण्यात येत आहे तर दुसरीकडे नागरिकांनी सुद्धा काळजी घेणे आवश्यक आहे.

## अजीम नवाज राही यांच्या ,,वळीवाच्या वेळा,, कवितासंग्रहास दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूरचा रत्नाकर काव्यपुरस्कार

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलडाणा :** दक्षिण महाराष्ट्र साहित्य कोल्हापूरचे वतीने देण्यात येणाऱ्या यंदाच्या रत्नाकर काव्यपुरस्काराची घोषणा दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूरचे अध्यक्ष भीमराव धुळूबुळू, सचिव डॉ विनोद कांबळे यांनी आज केली आहे.

प्रख्यात मराठी कवी,नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांच्या अथर्व पब्लिकेशन जळगावने प्रसिद्ध केलेल्या ,,वळीवाच्या वेळा,, या बहुचर्चित कवितासंग्रहास दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूरचा रत्नाकर उत्कृष्ट काव्यपुरस्कार जाहीर झाला आहे.10000 दहा हजार रुपये सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. 24 मे 2026 रोजी सकाळी 10,30 वाजता



शेठ रामभाई सामाणी स्मृती हॉल कोल्हापूर येथे उपरोक्त पुरस्कार वितरण सोहळ्याचे नामवंत साहित्यिकांच्या भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहे. प्रख्यात मराठी कवी आणि श्रोताप्रिय वक्ते, निवेदक अजीम नवाज राही महाराष्ट्र राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोन क्षेत्रातील महत्वाचं आणि वलयांकित नाव. व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत, वर्तमानाचा वतनदार, तळमळीचा तळ आणि अथर्व पब्लिकेशन जळगाव तर्फे नुकताच प्रसिद्ध झालेला ,, वळीवाच्या वेळा,, या पाच सकस कवितासंग्रहांचे ते धनी आहेत. अजीम नवाज राही हे नाव नवनिर्मितेचे प्रयोगाशीलतेचे बलस्थान असून कुठल्याही मळक्या वाटेने न जाता स्वतःची नाममुद्रा त्यांनी वर्तमान मराठी कवितेच्या पानावर ठसठशीतपणे उमटवली आहे.अजीम नवाज राही यांच्या कवितेने परिघावरचे विश्व मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी आणले. त्यांच्या कवितेतील व्यक्त होणारे दुःख सर्वसामान्यांच्या,शेतकरी, शेतमजुर, कामगारांच्या,शोषितांच्या किंबहुना अस्तित्वहीन माणसाच्या जगण्यातले आहे. प्रतितिष्ठासंपन्न कितीतरी श्रेष्ठ पुरस्कारांचा त्यांच्या कवितासंग्रहांवर वर्षाव झाला आहे. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,कोल्हापूर रत्नाकर काव्यपुरस्कार प्राप्त ,,वळीवाच्या वेळा ,, कवितासंग्रह समकालीन समाजमनाचं लख्ख प्रतिबिंब आहे. विद्यमान आव्हानांशी थेट भिडताना ,,वळीवाच्या वेळा,, मधली कविता आक्रस्ताळी वा कंठाळी होत नाही. धर्म,जात,पंथाच्या तटबंदीत न अडकता माणसांची निखळ काळजी वाहते. वास्तवाचा,सकसतेचा, प्रयोगशीलतेचा ध्यास असलेली ही कविता भाषिकअंगाने, अनुभवाच्या अंगाने अगदी समृद्ध आहे. समग्र चिंतीत वर्तमान कवेत घेणारी आहे. त्यांच्या कवितेतली गर्दगहिरी वस्तुनिष्ठता, घनगर्द सच्चाई, प्रतिमाशृंखलांचे अनोखे लावण्य, मातीचा सुवास लेवून आलेली भरजरी,चवदार भाषा.स्वतःची घडवलेली खास मृदगंधी शब्दकळा, ही मोठी दौलत घेऊन जगणारे,लिहिणारे अजीम नवाज राही वर्तमान पिढीतील महत्वाचे कवी आहेत. कवितागणिक, कवितासंग्रहागणिक त्यांच्या कवितेचे निराळेपण अधोरेखित झाले आहे. रेखांकित झाले आहे. मुस्लिम संस्कृती आणि या संस्कृतीबाहेरचा सर्वधर्मीय भोवताल, जीवनरितींचे बहुपदर घेऊन उभी राहिलेली त्यांची कविता मूळात मानव्याचे सुक्त गाणारी आहे. अजीम नवाज राही यांना आजतागायत अमेरिकेतील फाउंडेशन,भारतातील केशव गोरे स्मारक ट्रस्ट मुंबईचा साहित्य प्रांतातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र फाउंडेशन साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय लेखनाचा कवी केशवसुत पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा शरदचंद्र मुक्तीबोध, नारायण सुर्वे पुरस्कार ,आपटे वाचन मंदिर इचलकरंजीचा इंदिरा संत पुरस्कार,शरद पवार ग्रंथ पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, लोकमत समूहाचा लोकमत साहित्य पुरस्कार, भि ग रोहमारे पुरस्कार, शिवसेना नवरत्न पुरस्कार, शिंगणे परिवाराचा सहकारमहर्षी स्व भास्करराव शिंगणे पुरस्कार,कन्नडचा स्वातंत्र्यसेनानी,दलितमित्र भाऊसाहेब मोरे पुरस्कार, ना घ देशपांडे पुरस्कार, मराठा सेवा संघ जिजाऊ साहित्यरत्न पुरस्कार, शिक्षण महर्षी तात्याराव मोरे पुरस्कार उमरगा,कविवर्य देवानंद गोरडे पुरस्कार,मराठवाडा साहित्य परिषदेचा,साहित्य परिषद पुणेचा पुरस्कार, लोकनेते राजारामबापू पाटील पुरस्कार इत्यादी मातब्बर पुरस्कार मिळाले आहेत.

इयत्ता 10 वी ,इयत्ता 11वी व महाराष्ट्राच्या 11 विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा समावेश असून अजीम नावज राही राज्यभर भ्रमंती करणारे श्रोताप्रिय वक्ते आणि निवेदक आहेत.

**थोडक्यात**



## रायपूर येथील भारत गॅस एजन्सीच्या सिलेंडरच्या काळाबाजाराचा आरोप; शिवसेनेकडून तहसीलदारांना निवेदन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे

**चिखली :** शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार होत असल्याचा गंभीर आरोप करत शिवसेनेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे. शिवसेना उपशहर प्रमुख राहुल रामदास वरवंडे यांनी शहर प्रमुख श्रीराम झोरे यांच्या मार्गदर्शनात निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, रायपूर येथील भारत गॅस एजन्सीच्या काही सिलेंडरचा साठा चिखली शहरातील सैलानी नगर परिसरात करण्यात येत असून, काही नागरिकांकडून अधिक पैशांत गॅस सिलेंडर विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर केला जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांकडून १००० ते १५०० रुपयांपर्यंत रक्कम घेऊन गॅस सिलेंडर दिले जात असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. सामान्य ग्राहकांनाही निश्चित किमतीपेक्षा २०० ते ३०० रुपये अधिक आकारले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे परिसरात अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा सात दिवसांत कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही शिवसेनेकडून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार, जिल्हा पुरवठा विभाग आणि पोलीस स्टेशन यांना देण्यात आल्या आहेत. निवेदनावर मनोहर जाधव, पुंजाजी शेळके, समाधान जाधव, अक्षय झोरे,शेख अफसर, दिपक जाधव, संतोष देशमुख, दिलीप कापसे, प्रल्हाद वाघ रवी पेठकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

# पेट्रोल-डिझेल टंचाईचा गैरफायदा?

### कॅनीतून ग्रामीण भागात काळाबाजार सुरू असल्याची चर्चा;प्रशासनाने गुप्त पथक नेमण्याची मागणी...







भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

**मालेगांव :** मालेगाव शहरात सध्या पेट्रोल-डिझेल टंचाईची समस्या गंभीर बनत चालली असून सर्वसामान्य वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे विशेषतः कार,स्कूल बस,प्रवासी वाहने टँकर टिप्पर तसेच अत्यावश्यक कामासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना पेट्रोल पंपावर वेळेवर इंधन मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे मात्र दुसरीकडे ग्रामीण भागातील काही नागरिक मोठ्या प्रमाणात कॅनी,ड्रम व टाक्यांमध्ये पेट्रोल-डिझेल भरून नेत असल्याचे चित्र समोर येत आहे ट्रॅक्टर,शेती मशीन किंवा कृषी कामाच्या नावाखाली इंधन भरले जात असून त्यानंतर हेच पेट्रोल-डिझेल ग्रामीण भागात जादा दराने विकले जात असल्याची गुप्त माहिती समोर येत आहे मिळालेल्या माहितीनुसार,काही ठिकाणी डिझेल तब्बल १७० रुपये प्रति लिटर तर पेट्रोल २०० रुपये प्रति लिटर दराने विक्री होत असल्याची चर्चा सुरू आहे यामुळे इंधन टंचाईचा गैरफायदा घेत काळाबाजार वाढत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे विशेष म्हणजे,अत्यावश्यक सेवेसाठी धावणाऱ्या वाहनांना इंधन मिळण्यात अडचणी येत आहेत स्कूल बस,रुग्णवाहिका,प्रवासी वाहने रेती गीतीचे टिप्पर टँकर तसेच खासगी चारचाकी वाहनधारक अनेक तास रात्रभर पेट्रोल पंपावर रांगेत उभे राहत असूनही रिकाम्या हाताने परत जात असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.पेट्रोल पंपांवर गुप्त पथके नेमून संशयित वाहनांची तपासणी करावी,मोठ्या प्रमाणात साठा करणाऱ्यांवर छापेमारी करावी तसेच काळाबाजार करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी,अशी मागणी जोर धरत आहे इंधन टंचाईच्या काळात काही मोजक्या लोकांकडून साठेबाजी व काळाबाजार होत असेल तर त्याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे त्यामुळे प्रशासनाने तातडीने कारवाई करून इंधन पुरवठा सुरळीत करावा,अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** पणन, खाजगी बाजार, शेतकरी-ग्राहक बाजार तसेच ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्मसाठी परवाने देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे कोणत्याही व्यापाऱ्यांनी, संस्थांनी, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी किंवा शेतमाल व्यापाराशी संबंधित इतर घटकांनी आवश्यक परवान्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांनी दिला आहे.



महाराष्ट्र राज्यात शेतमाल खरेदी-विक्रीचे विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व नियम 1967 लागू असून, या कायद्याअंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेचे नियमन करण्यात येते. मात्र, राज्यातील विविध भागांमध्ये अनेक व्यापारी, काही संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून कोणताही परवाना न घेता मोठ्या प्रमाणावर शेतमाल खरेदी-विक्री केली जात असल्याच्या तक्रारी संबंधित कार्यालयाला प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधितांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. तरीदेखील काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, महाराष्ट्र शासनाने दि. 5 जुलै 2016 रोजी राजपत्र अध्यादेश क्रमांक 15 प्रसिद्ध केला असून, त्याच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना दि. 8 जुलै 2016 रोजी जारी करण्यात आल्या होत्या. तसेच दि. 31 डिसेंबर 2025 रोजी प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र शासन राजपत्रान्वये मुख्य अधिनियमाच्या कलम 6 मधील पोटकलम 2 मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार, कलम 5 (ड) मध्ये नमूद केलेल्या तरतुदींप्रमाणेच संबंधितांना बाजार समितीकडून परवाना घेणे आवश्यक राहणार आहे. मात्र, अशा परवानाधारकांकडून कोणतेही बाजार शुल्क आकारले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील ढासाळवाडी गावासाठी टँकर मंजूर

भारत संग्राम | प्रतिनिधी

**बुलढाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील ढासाळवाडी गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

ढासाळवाडी येथे 690 पशुधन व 1 हजार 510 लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे 35 हजार 900 लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## बुलढाण्यात २२ मे रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा; सुशिक्षित बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती तसेच अल्प मुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम STEP अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलढाणा आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ मे २०२६ रोजी, शुक्रवार पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्ह तथा रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) बुलढाणा येथे सकाळी १० वाजल्यापासून आयोजित करण्यात आला असून प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (PMIS) अंतर्गत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

या मेळाव्यात Mahindra & Mahindra तसेच Shinenumeru Nirman Pvt. Ltd. या नामांकित कंपन्यांनी त्यांच्या रिक्त पदांची अधिसूचना दिली आहे. मेळाव्यात कंपनी प्रतिनिधींकडून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्राथमिक निवड करण्यात येणार असून निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षणाची संधीही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

१० वी, १२ वी, आयटीआय, पदवीधर तसेच STEP अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले पुरुष व महिला उमेदवार या मेळाव्यात सहभागी होऊ शकतात. पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी मिळणार आहे.

उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. २२ मे रोजी सकाळी १० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहून नोंदणी करावी आणि कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत मुलाखत द्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे, सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा कार्यालयाशी दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२ वर संपर्क साधावा.

## अचूक व वेळेत घरयादी गणना पूर्ण करण्याच्या उपविभागीय अधिकारी प्रा .खडसे यांच्या सूचना

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे




**बुलढाणा :** उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिंदखेड राजा यांच्या वतीने जनगणना २०२६ संदर्भात ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये जनगणना प्रक्रियेचे नियोजन, प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती तसेच तालुकानिहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

उपविभागीय अधिकारी यांनी सर्व संबंधित अधिकारी, पर्यवेक्षक व कर्मचाऱ्यांना घरयादी गणना अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर, माहिती संकलन प्रक्रिया आणि क्षेत्रीय समन्वय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत सादर करण्यात आलेल्या विवरण पत्रानुसार सिंदखेड राजा व देऊळगाव राजा talukयातील शहरी व ग्रामीण भागासाठी प्रगणक व पर्यवेक्षकांची संख्या पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे : अ. क्र.| तालुक्याचे नाव| शहरी / ग्रामीण| प्रगणक संख्या| पर्यवेक्षक संख्या 1| सिंदखेड राजा| शहरी| 28| 5 2| सिंदखेड राजा| ग्रामीण| 268| 45 3| देऊळगाव राजा| शहरी| 71| 12 4| देऊळगाव राजा| ग्रामीण| 162| 26 बैठकीस सर्व पर्यवेक्षक, कर्मचारी तथा अधिकारी उपस्थित होते. जनगणना २०२६ हे महत्त्वपूर्ण राष्ट्रीय कार्य असून नागरिकांनी प्रशासनास आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



# भोजन, श्रम आणि करुणा



पु. भंते धम्मरक्खित
9935827962



**बुद्धांनी त्यांच्या विचारधारेत मानवाच्या मूलभूत गरजांकडे अत्यंत संवेदनशीलतेने पाहिले गेले आहे. त्यामध्ये "भोजन" ही केवळ पोट भरण्याची गोष्ट नसून, ती जीवन टिकवणारी पवित्र प्रक्रिया मानली गेली आहे. अन्न हे श्रमातून निर्माण होते आणि त्या श्रमामागे शेतकऱ्याचे कष्ट, निसर्गाची कृपा आणि समाजाची परस्परावलंबी व्यवस्था दडलेली असते. म्हणूनच बुद्धांनी अन्नाचा आदर, श्रमाचे महत्त्व आणि संयमी जीवन यावर विशेष भर दिला. आजच्या आधुनिक युगात माणूस प्रगतीच्या नावाखाली वेगाने पुढे जात असला तरी, अन्नाचे महत्त्व आणि शेतकऱ्याच्या कष्टांची जाणीव कमी होत चाललेली दिसते. एका बाजूला लाखो लोक अन्नाच्या अभावामुळे उपाशी झोपतात, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणात अन्न वाया घालवले जाते. ही विसंगती मानवतेसाठी चिंतेचा विषय आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे विचार समाजाला नवी दिशा देणारे ठरतात. धम्मपदात बुद्धांनी लोभ, अतिरेक आणि असंयम यांचा त्याग करून मध्यम मार्ग स्वीकारण्याचा उपदेश केला आहे. भोजनाबाबतही त्यांनी संयम, कृतज्ञता आणि जागरूकता यांचा संदेश दिला.**

धम्मपद गाथा ७
"सुभानुपस्सिं विहरन्तं,इन्द्रियेसु असंवुतं।
भोजनम्हि च अमत्तञ्ञुं,कुसितं हीनवीरियं॥"
अर्थ :

जो मनुष्य विषयभोगात रमतो, इंद्रियांवर संयम ठेवत नाही, भोजनात मर्यादा पाळत नाही आणि आळशी असतो, त्याला दुःख सहज जिंकते.

धम्मपद गाथा ८
"असुभानुपस्सिं विहरन्तं,इन्द्रियेसु सुसंवुतं।
भोजनम्हि च मत्तञ्ञुं,सद्धं आरद्धवीरियं॥"
अर्थ :

जो मनुष्य इंद्रियांवर संयम ठेवतो, भोजनात मर्यादा जाणतो, श्रद्धावान आणि परिश्रमी असतो, त्याला कोणतेही दुःख डगमगवू शकत नाही.

"भुकेल्याला अन्नदान हे सर्वोच्च दान आहे" हा विचार बुद्धांच्या करुणेचा मूलाधार आहे. अन्न हे केवळ शरीराचे पोषण करत नाही, तर ते समाजात प्रेम, दया आणि सहजीवनाची भावना निर्माण करते.

शेतकरी हा या अन्नसाखळीचा केंद्रबिंदू आहे. तो स्वतः कष्ट सहन करून संपूर्ण समाजाचे जीवन पोसतो. उन्हाची तिव्रता, पावसाची अनिश्चितता, कर्जाचा भार आणि बाजारपेठेतील अस्थिरता यांचा सामना करत तो शेती टिकवून ठेवतो. बुद्धांच्या दृष्टीने असा श्रमिक माणूस अत्यंत पूजनीय आहे, कारण प्रामाणिक श्रम हेच खरे धर्मकार्य आहे.

धम्मपदातील गाथांमध्ये मनुष्याने लोभाचा त्याग करून साधे, संयमी आणि कृतज्ञ जीवन जगावे असा संदेश दिला आहे. भोजन घेताना सजगता ठेवणे, अन्नाचा अपव्यय न करणे आणि प्रत्येक घासामागील श्रम ओळखणे हे बुद्धांच्या शिकवणीचे महत्त्वाचे अंग आहे. आजच्या काळात ही शिकवण अधिक आवश्यक वाटते.समाजात शांतता, समता आणि करुणा टिकवायची असेल तर अन्न आणि श्रम यांचा आदर करणे गरजेचे आहे. बुद्धांचे विचार केवळ आध्यात्मिक नाहीत, तर ते सामाजिक आणि मानवी मूल्यांचेही मार्गदर्शक आहेत. म्हणूनच भोजन, शेतकरी आणि श्रम याविषयीचा बुद्धांचा दृष्टिकोन आजच्या जगाला अधिक संवेदनशील, न्याय्य आणि मानवतावादी बनवू शकतो.

बौद्ध साहित्यामधील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथातील गाथांमधून तथागत गौतम बुद्ध यांनी मानवाला साधे, संयमी, करुणामय आणि जागरूक जीवन जगण्याचा संदेश दिला आहे. धम्मपद हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवणारा मानवी मूल्यांचा स्त्रोत आहे. भोजन, श्रम, करुणा आणि मध्यम मार्ग या संकल्पना धम्मपदात अत्यंत प्रभावीपणे मांडल्या गेल्या आहेत.

: जीवनाचा आधार भोजन

मानवाच्या अस्तित्वासाठी अन्न आवश्यक आहे. अन्नाशिवाय शरीर टिकू शकत नाही आणि शरीराशिवाय साधना, विचार किंवा समाजजीवन शक्य होत नाही. बुद्धांनी भोजनाकडे केवळ भूक भागवण्याचे साधन म्हणून पाहिले नाही, तर ते जीवन टिकवणारी पवित्र प्रक्रिया मानली.

धम्मपदातील अनेक गाथांमध्ये संयमित जीवनावर भर देण्यात आला आहे. अति खाणे, लोभ आणि भोगवादी वृत्ती यामुळे मनुष्य दुःखाच्या मार्गावर जातो असे बुद्धांनी सांगितले. भोजन हे शरीरासाठी आवश्यक असले तरी त्यामध्ये विवेक आणि मर्यादा असणे आवश्यक आहे. बुद्ध भिक्षूंना सांगत असत की, "भोजन हे शरीर टिकवण्यासाठी आहे; सुखोपभोगासाठी नाही."

आजच्या उपभोगवादी संस्कृतीत ही शिकवण अत्यंत महत्त्वाची आहे. लोक अन्नाचा अपव्यय करतात, तर दुसरीकडे अनेक गरीब लोक उपाशी राहतात. बुद्धांचा संदेश आपल्याला प्रत्येक घासामागील मूल्य समजावून सांगतो. अन्नाचा आदर करणे म्हणजे निसर्गाचा आणि श्रमाचा आदर करणे होय.

अन्नदान : सर्वोच्च दान

बौद्ध तत्त्वज्ञानात दानाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामध्ये अन्नदान हे श्रेष्ठ दान मानले गेले आहे. कारण भुकेल्या माणसाला अन्न मिळाले की त्याला जगण्याची शक्ती मिळते. बुद्धांनी अनेक ठिकाणी करुणेचा संदेश देताना भुकेल्याला अन्न देण्याचा उपदेश केला आहे.

अन्नदानामागे केवळ दया नसते, तर समतेची भावना असते. प्रत्येक मनुष्याला जगण्याचा अधिकार आहे आणि त्या अधिकाराचा पाया म्हणजे भोजन. समाजात कोणीही उपाशी राहू नये, हीच बुद्धांची करुणामय भूमिका होती.

आजच्या समाजात अन्नछत्र, सामुदायिक भोजन आणि गरीबांना अन्नवाटप यांसारख्या उपक्रमांमध्ये बुद्धांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते. अन्नदान हे केवळ धार्मिक कार्य नसून सामाजिक न्यायाची प्रक्रिया आहे.

शेतकरी : समाजाचा खरा पालनकर्ता

अन्न तयार करण्यामागे शेतकऱ्याचे अथक श्रम असतात. तो मातीशी नाते जोडून संपूर्ण समाजाचे पोषण करतो. बुद्धांच्या काळातही शेतीला अत्यंत महत्त्व होते आणि शेतकरी समाजाचा आधारस्तंभ मानला जात असे.

शेतकरी पाऊस, ऊन, वादळ आणि संकटांचा सामना करत शेती करतो. त्याच्या कष्टामुळेच लोकांच्या ताटात अन्न येते. बुद्धांनी प्रामाणिक श्रम करणाऱ्या व्यक्तीचा आदर करण्याचा संदेश दिला. श्रमाला त्यांनी पवित्रता दिली.

आजच्या काळात शेतकरी अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. कर्जबाजारीपणा, उत्पादन खर्च, बाजारपेठेतील चढउतार आणि नैसर्गिक संकटे यामुळे त्याचे जीवन कठीण झाले आहे. अशा वेळी समाजाने शेतकऱ्याच्या श्रमाचे मूल्य ओळखणे गरजेचे आहे.

धम्मपदातील शिकवण सांगते की, "जो इतरांच्या हितासाठी श्रम करतो, तो खऱ्या अर्थाने श्रेष्ठ आहे." शेतकरी हा त्याच विचाराचा जिवंत नमुना आहे.

मध्यम मार्ग आणि भोजनातील संयम

बुद्धांनी जीवनात मध्यम मार्ग स्वीकारण्याचा उपदेश केला. अति उपभोग आणि अति त्याग या दोन्ही टोकांच्या मार्गांना त्यांनी नाकारले. भोजनाच्या बाबतीतही त्यांनी संतुलनावर भर दिला.

अतिखाणे शरीर आणि मन दोन्हीला हानीकारक असते. त्याचप्रमाणे उपासमारीही दुःख निर्माण करते. म्हणूनच आवश्यक तेवढे, शुद्ध आणि साधे अन्न घेणे हा बुद्धांचा संदेश होता.

आज अनेक आजार चुकीच्या आहारामुळे वाढत आहेत. असंतुलित जीवनशैलीमुळे माणूस मानसिक आणि शारीरिक तणावात अडकत आहे. बुद्धांचा संयमाचा मार्ग आधुनिक आरोग्यशास्त्रालाही पूरक वाटतो.

भोजन आणि कृतज्ञता

धम्मपदातील विचारांमध्ये कृतज्ञतेला महत्त्वाचे स्थान आहे. आपण जे अन्न खातो, त्यामागे अनेकांचा सहभाग असतो — शेतकरी, निसर्ग, पाणी, प्राणी आणि समाजव्यवस्था. त्यामुळे भोजन घेताना नम्रता आणि कृतज्ञता असणे आवश्यक आहे.

आजच्या काळात लोक अन्न सहज उपलब्ध असल्यामुळे त्याचे मूल्य विसरतात. हॉटेलमध्ये, समारंभात आणि घरांमध्ये मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. बुद्धांच्या शिकवणीनुसार अन्नाचा अपव्यय हा लोभ आहे.

जर प्रत्येक व्यक्तीने भोजनाबाबत सजगता ठेवली, तर समाजात उपासमार कमी होऊ शकते. अन्नाचा सन्मान करणे म्हणजे जीवनाचा सन्मान करणे होय.बुद्धांचे संपूर्ण तत्त्वज्ञान करुणेवर आधारित आहे. भोजन ही करुणेची सर्वात मूलभूत अभिव्यक्ती आहे. आई आपल्या मुलाला अन्न देते, शेतकरी समाजाला अन्न देतो आणि समाज गरिबांना अन्नदान करतो — हीच करुणेची साखळी आहे.धम्मपदातील गाथा सांगतात की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेमाने आणि करुणेनेच तो संपतो. अन्नवाटप ही त्या करुणेची प्रत्यक्ष कृती आहे.समाजात भूक, दारिद्र्य आणि असमानता कमी करायची असेल तर बुद्धांचे विचार अंगीकारणे आवश्यक आहे. करुणा आणि वाटण्याची भावना वाढवली तर समाज अधिक शांत आणि समतामूलक होऊ शकतो.

धम्मपदातील भोजन आणि श्रमाविषयीचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. बुद्धांनी अन्नाला पवित्र मानले, श्रमाचा सन्मान केला आणि संयमी जीवनाचा मार्ग दाखवला. शेतकरी हा समाजाचा जीवनदाता आहे आणि त्याच्या कष्टामुळेच मानवजातीचे अस्तित्व टिकून आहे.

आजच्या काळात अन्नाचा अपव्यय, उपासमार, शेतकऱ्यांच्या समस्या आणि भोगवादी संस्कृती यामुळे समाज अनेक संकटांना सामोरे जात आहे. अशा परिस्थितीत बुद्धांची शिकवण मानवाला संवेदनशील आणि जबाबदार बनवते.

जर आपण अन्नाचा आदर केला, शेतकऱ्याच्या श्रमाचे मूल्य ओळखले आणि करुणेची भावना जपली, तर समाजात अधिक समता, शांतता आणि मानवता निर्माण होईल. धम्मपदाचा संदेश केवळ वाचण्यासाठी नाही, तर तो आचरणात आणण्यासाठी आहे. बुद्धांचे विचार आजही मानवतेसाठी प्रकाशाचा मार्ग आहेत.

# नागेशवाडीत दूषित पाणी प्रकरण; रुग्णालयापासून गावापर्यंत आमदार सिद्धार्थ खरात यांची सतर्क धाव

## आमदार सिद्धार्थ खरात यांचा घटनास्थळी धाव घेत प्रशासनाला कडक इशारा

**भारत संग्राम | प्रतिनिधी**





**मेहकर :** तालुक्यातील घाटबोरी गट ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या नागेशवाडी येथे दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रो व डायरियाचा प्रादुर्भाव होऊन गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत ५० हून अधिक नागरिक बाधित झाल्याची माहिती समोर आली असून अनेक रुग्णांवर मेहकर ग्रामीण रुग्णालय तसेच जानेफळ प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. या संपूर्ण घटनेची गंभीर दखल घेत आमदार सिद्धार्थ खरात यांनी सुरुवातीपासूनच सातत्याने पाठपुरावा करत प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. घटना समोर आल्यानंतर आ. सिद्धार्थ खरात यांनी सर्वप्रथम मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट देत उपचार घेत असलेल्या रुग्णांची विचारपूस केली. प्रत्येक रुग्णाशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली तसेच नातेवाईकांना धीर दिला. रुग्णांना योग्य उपचार मिळत आहेत का, औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे का, डॉक्टर व आरोग्य कर्मचारी योग्य प्रकारे सेवा देत आहेत का याचीही त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर त्यांनी जानेफळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन तेथील रुग्णांची भेट घेतली. ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत वैद्यकीय अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा न करण्याच्या सूचना दिल्या. याच पार्श्वभूमीवर आज आमदार सिद्धार्थ खरात यांनी नागेशवाडी व टेंभुर्खेड गावांना प्रत्यक्ष भेट देत संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला. गावात जाऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला, दूषित पाण्याच्या स्त्रोतांची पाहणी केली तसेच ज्या विहिरीतील पाण्यामुळे नागरिक आजारी पडल्याचा संशय आहे त्या विहिरीचीही प्रत्यक्ष पाहणी केली. पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने तातडीने तपासणी करून गावाला शुद्ध पाणी पुरवठा करावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. गावातील परिस्थिती पाहून आ. खरात यांनी प्रशासनाला कठोर शब्दांत इशारा दिला. नागरिकांच्या आरोग्याशी कोणालाही खेळ करता येणार नाही. निष्काळजीपणा अथवा गैरप्रकार अजिबात सहन केला जाणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा जबाबदारांवर कारवाई व्हावी, अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी प्रशासनाला सुनावले. दरम्यान, गावात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाल्याने आरओ फिल्टरचे पाणी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले. तसेच गावात आरोग्य विभागाकडून विशेष पथके तैनात करून औषध फवारणी, पाण्याचे नमुने तपासणी आणि नागरिकांची आरोग्य तपासणी सुरू करण्यात आली आहे. मेहकर ग्रामीण रुग्णालय व जानेफळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांची प्रकृती सध्या स्थिर असून अनेक रुग्ण उपचारानंतर बरे झाले असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. या पाहणी दौऱ्यात शिवसेना उ.बा.ठा. तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, घाटबोरी सरपंच राजू पाखरे, एबीडीओ संदीप मेटांगळे, राजकुमार पाखरे, आकाश नवले, ग्रामपंचायत अधिकारी शरद वानखेडे, संतोष अंभोरे, दिनकर अंभोरे, धनराज राठोड, नागेश राठोड, विजयसिंह चव्हाण, सुभाष पवार, डॉ. अनिकेत राठोड, डॉ. प्रीती गवई, विठ्ठल घुगे तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.